स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 22–02–2016** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. राजू भाऊरावजी नागूलवार | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 13. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 14. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 2. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 661:– प्रभाग क्र. 72 ब अंतर्गत इंद्रप्रस्थनगर येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. पी. एम.ए. कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 29,95,393/– च्या दरापेक्षा 3.50 प्रतिशतने अधिक दराची रु. 31,00,232/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 662</u>:— प्रभाग क्र. 72 क अंतर्गत पारधी ले—आऊट व मालडोंगरे ले—आऊट, जयताळा येथील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त मे. पी.एम.ए. कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 29,94,167/— च्या दरापेक्षा 3.50 प्रतिशतने अधिक दराची रु. 30,98,963/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 663</u>:— प्रभाग क्र १० अ ब मधील नई बस्ती व खिश्चन कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदा पैकी मे. एस. के. गुरूबक्षाणी यांची निम्नतम निविदा मूळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५१% अधिक दराची निविदा राशी रू. ३१,०२,३४२/— ( एकतीस लक्ष दोन हजार तीनशे बेचाळीस फक्त ) रक्कमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 664</u>:— प्रभाग क्र. 72 क अंतर्गत जयताळा येथे डांबरीकरण व सिमेंट फ्लोरिंगचे काम करण्यास्तव प्राप्त मे. पी.एम.ए. यांची मूळ प्राकलनीय राशी रु. 39,89,291/— ची निविदा 3.50 प्रतिशतने अधिक दराची रु. 41,28,916/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 665 :—</u> प्रभाग क्र. 30 अ आणि ब, मधील आर.ओ.बी. जवळील रियाल पटेल रोड व जागनाथ मंदीर ते पिवळी मारबत रोड पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त १६ निविदांपैकी मे. जी. बी. कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा १.१० प्रतिशत ने कमी दरांची रू. २९,६६,७३४/— (अक्षरी एकोणतीस लक्ष सहासष्ठ हजार सातशे चौतीस रूपये) रकमेची सूधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 666</u> :— प्रभाग क्र. ४५/ब, झोन क्र. ५ मधील शक्तीमाता नगर, डायमंड नगर, गाडगेबाबा नगर, रतन नगर, शेष नगर, भाग्यश्री नगर व ऑरेंज नगर येथे ६ मिटर खांब व फिटिंग्ज लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरीता निविदा बोलविल्या असता, प्राप्त ५ निविदांपैकी, में. अनिल इलेक्ट्रीकल ॲन्ड असोसिएटस्, नागपूर, यांची निम्नतम दर रु. ४१,३७,५०४/- ची प्राकलनीय दरापेक्षा १२.७% ने कमी च्या निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 667</u> :— नागपूर शहरातील स्वयंचलित वाहतूक नियंत्रकाच्या (Automatic Traffic Signal) दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे कंत्राटदार में. डेकोफर्न कन्स्ट्रक्शन, नागपूर यांच्या मार्च २०११ ते ४ फेब्रुवरी २०१४ पर्यंतच्या (कार्यादेशानुसार) कालावधीतील कामाची एकूण रक्कम रु.

६२,४१,८३८/-, ही कार्यादेशाच्या रकमेपेक्षा म्हणजेच रु. ४६,१०,८०८/- पेक्षा जास्त होत असल्यामुळे, शिल्लक असलेल्या रु. १६,३१,०३०/- चे भूगतान करण्यास मंजूरी प्रदान करणे तसेच जुन्या कंत्राटाची मुदत संपून नविन कंत्राट सुरु होईपर्यंतच्या म्हणजेच ५ फेब्रुवरी २०१४ ते ११ मार्च १५ पर्यंतच्या कालावधीकरीता, जुन्या मंजूर दराने रु. २१,०७,४७७/- चे भूगतान करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 668</u>:— प्रभाग क्रं. ७१ येथील रेणका माता मंदिर यशोदानगर , रेणूका ले आउट, हिंगणा रोड चे नुतनीकरण/ व विविध विकास कामे “ब’’ तिर्थक्षेत्र अंतर्गत करण्यास्तव रू. ४,७८,०९,८९१.०० /— कोटी रक्कमेच्या प्राकलनाप्रमाणे म.न.पा.च्या वित्तीय सहभागाकरीता मंजूरी तसेच या कामास्तव मे. भिवगडे ॲड असोसिएटस् यांची प्रकल्प व्यवस्थावकीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न विचारात घेऊन, त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 669</u>:— प्रभाग क्रं. ७२ येथील शिवमंदिर एच. बी. इस्टेट, सोनेगाव नुतनीकरण/ व विविध विकास कामे ‘‘क’’ तिर्थक्षेत्र अंतर्गत करण्यास्तव रू.३,५२,८०,४४३.०० /— कोटी रक्कमेच्या प्राकलनाप्रमाणे म.न.पा.च्या वित्तीय सहभागाकरीता मंजूरी तसेच या कामास्तव मे. भिवगडे ॲड असोसिएटस् यांची प्रकल्प व्यवस्थावकीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न विचारात घेऊन, त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 670</u>:— नागपूर महानगरपालिका, नागपूर तथा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (म.) यांच्या संयुक्त विद्यमाने व सहकार्याने 25 फेब्रुवारी ते 28 फेब्रुवारी, 2016 रोजी ‘‘नागपूर महोत्सव–2016’’ कार्यक्रम यशवंत स्टेडीयम येथे आयोजीत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाअंतर्गत 5 दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम शहरातील नागरिकांना निःशुल्क उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत, तसेच दहा क्षेत्रिय कार्यालय स्तरावर दि. 19 फेब्रुवारी, 2016 ला विविध सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे नागपूर महोत्सवाची सुरुवात करण्यात येणार असून शहरातील स्थानिक कलावंतांचा यामध्ये सहभाग असावा ही या पाठीमागची पार्श्वभूमी असून नागरी सहभागाने हे कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

हा कार्यक्रम मागील अनेक वर्षापासून यशस्वीपणे आयोजित करण्यात येत असून, यापूढेही सतत चालू रहावा असा निश्चय आहे.यासाठी यावर्षी हा कार्यक्रम महानगरपालिकेपुरता मर्यादित न ठेवता करणे, शहरातील नागरिक, संस्थांचा तथा लोकसहभागामधून आर्थिक सहभाग अपेक्षीत आहे. त्याकरिता नागपूर महोत्सवा निमित्त एक स्मरणिका प्रकाशित करुन याद्वारे निधी गोळा करण्यासाठी तसेच त्यासाठी एक स्वतंत्र खाते उघडून जमा केलेल्या निधीचा नागपूर महोत्सव कार्यक्रमासाठी विनियोग करावा असे या कार्यक्रमाच्या आयोजन समितीच्या दि.

15/02/2016 च्या सभेमध्ये निर्देश प्राप्त झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट ॲक्ट – 1960 चे कलम 41 (क) अंतर्गत सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे अभियोजन विभागाने पुढाकार घेवून रितसर परवानगी घेण्याचे सुध्दा निर्देश दिलेले आहेत. तसेच याच उद्देशाकरिता एक स्वतंत्र खाते उघडून प्रमुख लेखा व वित्त अधिकारी तथा निगम सचिव यांना प्राधिकृत करण्यात यावे व नियमाप्रमाणे ''नागपूर महोत्सव – 2016'' करीता संपन्न होणाऱ्या सर्व खर्चाचा तपशिल सादर करण्याची जबाबदारी सुध्दा त्यांचेवर राहील असे ही निर्देश उपरोक्त सभेत देण्यात आले आहेत.

1) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचे म.प.वि.म./866/नागपूर महोत्सव/2015 दि. 12.02.2016 च्या पत्राच्या अनुषंगाने नागपूर महोत्सव 2016 हा कार्यक्रम घेण्याच्या दृष्टीने ज्या संयोजक अभिकर्ता संस्थांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने प्राधिकृत केले आहे अशा संस्थांना कार्यक्रम संयोजक अभिकर्ताला (एजन्सी) कार्यादेश देण्याचे अधिकार आयुक्त, म.न.पा. यांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित, मूंबई यांचे दिनांक 20.02.2016 क्रमांक म.प.वि.म./महोत्सव नामपा/866/2016 प्रमाणे त्यांनी दिलेल्या मंजूरी प्रमाणे नागपूर महोत्सवासाठी मे. लोकमत मिडीया प्रा. लि. यांना कार्यक्रम संयोजक म्हणून कार्यादेश देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) दि. 25 ते 28 फेब्रुवारी 2016 या पाच दिवसात ज्या प्राधिकृत केलेल्या संयोजक संस्था किंवा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या किंवा कलावंतांना वित्तीय भुगतान करण्याचे अधिकार आयुक्त म.न.पा. यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दिनांक 25 ते 28 फेब्रुवारी ऐवजी दिनांक 28 फेब्रुवारी ते 2 मार्च 2016 या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली

3) महानगरपालिकेच्या वित्तीय सहभागातून आवश्यक व तात्काळ स्वरुपाची कार्यक्रम व्यवस्थीतरित्या आयोजित करण्याच्या दृष्टीने विभागास कुठलेही कामे करावयाची झाल्यास त्यास निविदाद्वारे किंवा आवेदनाद्वारे वित्तीय मर्यादा लक्षात घेऊन काढण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारणीस राहिल यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

4) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्याद्वारे अनुदान स्वरुपात जो निधी म.न.पा. स प्राप्त होणार आहे तसेच नागपूर महोत्सवा निमित्त स्मरणिकेतील विविध जाहिरातीद्वारे देणगी स्वरुपात निधी गोळा होणार आहे. त्याचे व महानगरपालिकेला आपल्या हिस्साचे एकूण रु. 50 लक्ष वहन करावयाचे आहे. त्याकरिता रु. 50 लक्ष खर्च म.न.पा. तर्फे करण्याकरिता वित्तीय मान्यतेकरिता स्थायी समितीची अनुमती आवश्यक असल्यामुळे वित्तीय मान्यतेचा प्रश्न विचारात घेऊन एक स्वतंत्र खाते उघडून जमा केलेल्या निधीचा नागपूर महोत्सव कार्यक्रमासाठी विनियोग करण्याचे अधिकार आयुक्त, म.न.पा. यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, महानगरपालिकेला आपल्या हिस्स्याचे एकूण रु. 50 लक्ष ऐवजी रु. 100 लक्ष वहन करावे लागतील या कार्यालयाच्या सुचनेसह रु. 100 लक्षाच्या वित्तीय मान्यतेस स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 671 :–</u> पान क्र. ९/टी वरील मंजुरीच्या अनुषंगाने निम्नतम निविदाकार में. सोनू इलेक्ट्रीकल्स, नागपूर, यांची

प्राकलनिय दरापेक्षा १३.३% ने कमी असलेली म्हणजेच रु. ३३,२२,८८२/- ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 672</u>:— म.न.पा. तील ई—कचरा विल्हेवाट लावण्याकरीता स्थायी समिति ठराव क्र. 66, दि. 26.05.2015 अन्वये उपनिगम आयुक्त दर्जाचे अधिकारी व स्थायी समितीचे दोन सदस्य अशी तीन सदस्यांची उपसमिती स्थापन करण्यात आली. त्या उपसमितिच्या दि. 09.09.2015 च्या बैठकीमध्ये खालील निर्णय घेण्यात आले.

1) ई—कचरा विल्हेवाट ही निविदा काढुन करण्यात यावी ("जेथे आहे ज्या स्थितीत आहे" त्या आधारावर)

2) ई—कचऱ्याची विल्हेवाट लॉट नुसार न करता नगा नुसार करण्यात यावी.

3) आतापर्यंत जमा झालेल्या ई—कचऱ्याची विल्हेवाट निविदा काढुन करण्यात यावी.

4) निविदाकार हा Authorized dismantler / authorized recycler of State Pollution Control Board or producer असावा अशी अट निविदेत टाकण्यात यावी.

उपसमितीच्या निर्णयानुसार ई—कचऱ्याचे रू.104965/— चे मुल्यमापन करून ई—कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निविदा बोलावून विक्री करण्यास स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर केला असता, स्थायी समितीने त्यास ठराव क्र. 231, दि. 16. 10.2015 अन्वये मंजुरी प्रदान केली.

त्या अनुषंगाने निविदा बोलविल्या असता एकच निविदा प्राप्त झाली. सबब दुसऱ्यांदा व तिसऱ्यांदा निविदेस मुदतवाढ देण्यात आली. तिसऱ्या मुदतवाढीनंतर सुध्दा मे. सुरीटेक्स प्रा. लि. नागपूर यांची एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे त्यांची तांत्रिक Bid उघडण्यात आली. तांत्रिक मुल्यमापनानुसार त्यांची निविदा Price Bid उघडण्यात पात्र ठरली. त्यानुसार त्यांची Price Bid उघडली असता त्यांचे रू. 56900/— चे दर प्राप्त झाले. वाटाघाटीनंतर रू.61081/— चे दर प्राप्त झाले.

सबब मे. सुरीटेक्स प्रा. लि. नागपूर यांची रू.61081/— ची ई—कचरा विल्हेवाट लावणेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 673</u>:— शक्तीमाता नगर येथे सिमेंट काँक्रिट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन, यांची प्राकलनीय दरापेक्षा १८.१० टक्के कमी दराची रू. २५,२४,३९०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 674</u>:— प्रभाग क्र. ४ अ नयी बस्ती येथील इब्राहीम कुरेशी यांचे घरापासुन ते जमील ड्रायव्हर व मक्का मस्जीद ते रोशन हाजीचे घरापर्यंत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त १३ निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा २५.२५ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ४०,४३,१०४/— (अक्षरी चाळीस लक्ष त्रेचाळीस हजार एकशे चार रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>विषय क्रमांक 675</u>:— प्रभाग क्र. 26, येथील छोटी धंतोली व मेहाडीया चौक ते मुंजे चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण चौका पर्यंत डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में. एस. के. गुरूबक्षाणी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.5 % टक्के अधिक दराची निविदा रूपये 31,04,224/–( रूपये एकतीस लक्ष चार हजार दोनशे चोविस रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न तसेच,

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 676</u>:— प्रभाग क्र. ७२ क अंतर्गत विजय विहार येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त मे. सेठ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची मूळ प्राकलनीय राशी रु. २९,८२,४०१/— ची निविदा ३.५० प्रतिशतने अधिक दराची रु. ३०,८६,७८५/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्वीकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 677</u>:— प्रभाग क्र. ६ ब जरिपटका येथील क्रिपलानी हॉस्पिटल ते सिंधू सोसायटी पर्यंत इरोज वाईन शॉप ते चौधरी चौक पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव रु. २७,९५,६१३/— प्राकलन रु. जुने पद क्र. ६८० व नवीन पद क्र. A42001374612 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 678</u>:— नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागा अंतर्गत येणाऱ्या झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत दुकाने/ओटे/जागा यांच्याबाबत विभागाच्या असे निदर्शनास आले आहे कि, झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत काही प्रकरणांमध्ये परिवर्तन प्रस्तावास मान्यता प्राप्त आहे. परंतु त्या परिवर्तन प्रस्तावाच्या धारीकेमध्ये परिवर्तन केल्याबाबतचे परिवर्तन प्रपत्र/करारनामा यांच्यावर तत्कालीन सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी प्राप्त केलेली नाही.

त्याचप्रमाणे झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत काही प्रकरणांमध्ये परिवर्तन प्रस्तावास मान्यता प्राप्त केल्यानंतर त्या परिवर्तन प्रस्तावाच्या धारीकेमध्ये परवाना प्रपत्र/करारनामे जोडलेले नाहीत. त्याच प्रमाणे झोन क्र. 1 ते 10 येथील एकुण 533 धारीका गहाळ असल्यामुळे सुचित ठराव स्थायी समिती, म.न.पा. पुढे मान्यतेस सादर करावे, असे मा. आयुक्त, म.न.पा. यांनी आदेशीत केले आहे. ह्या अनुषंगाने विस्तृत प्रस्ताव पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

संबंधीत प्रकरण बाजार विभागामधील झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत असलेले दुकान/ओटे/जागा ह्याचा बाबतचा असुन, ज्या प्रकरणात परिवर्तन प्रस्ताव मंजुर झालेले आहेत आणि त्यांचे परवाने प्रपत्र व करारनामे त्या–त्या झोनच्या अंतर्गत असलेल्या धारीकेमध्ये जोडलेले आहेत. परंतु त्या परवाने प्रपत्र करारनाम्यावर तत्कालीन सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी तत्कालीन बाजार विभागाचे कर्मचारी यांनी घेतलेली नसल्याने, तसेच ज्या प्रकरणात परिवर्तन प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे. परंतु त्या परिवर्तन प्रकरणांमध्ये परवाने प्रपत्र आणि करारनामे जोडुन तत्कालीन सक्षम अधिकाऱ्यांच्या

निदर्शनास आणुन त्यांची स्वाक्षरी न घेतल्यामुळे, अशा परिवर्तन प्रस्तावास वैद्य गृहीत धरता येणार नाही. आणि बाजार विभागातील झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत एकुण 533 धारीका गहाळ असल्यामुळे, या धारीकांना सुध्दा नियमितीकरण करण्याची आवश्यकता आहे. परंतु अशाही प्रकरणांमध्ये विभागाला महिनेवारी परिवर्तन शुल्क प्राप्त होत आहेत. उक्त प्रकरणांबाबतचा खालील तक्त्यामध्ये माहिती सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | झोनचे नांव व क्र. | ज्या नंस्तीमध्ये परवाना परिवर्तन/ करारनामा जोडलेला आहे. परंतु बाजार निरिक्षक/ बाजार अधिक्षक आणि अति. उप. नि. आयुक्त/उपायुक्त /सचिव यांची स्वाक्षरी नाही. | परवाना प्रपत्र जोडलेले नाही. | इस्टेट ऑफीसरची सही | प्रपत्र कोरे आहे | नस्ती गहाळ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | धरमपेठ झोन क्र. 2 | 45 | 104 | 02 | 00 | 21 | **172** |
| 2 | धंतोली झोन क्र. 4 | 18 | 28 | 00 | 01 | 163 | **210** |
| 3 | गांधीबाग झोन क्र. 6 | 70 | 154 | 00 | 00 | 122 | **346** |
| 4 | सतरंजीपुरा झोन क्र. 7 | 21 | 00 | 00 | 00 | 05 | **26** |
| 5 | लकडगंज झोन क्र. 8 | 77 | 165 | 00 | 00 | 19 | **261** |
| 6 | आसिनगर झोन क्र. 9 | 59 | 49 | 00 | 00 | 00 | **108** |
| 7 | मंगळवारी झोन क्र. 10 | 00 | 22 | 00 | 00 | 203 | **225** |
| **एकुण** | | **290** | **522** | **02** | **01** | **533** | **1348** |

म्हणुन अशा प्रकरणांना (1. ज्या परिवर्तन प्रकरणांमध्ये तत्कालीन मा. उपायुक्त/मा. अति उपनिगम आयुक्त, म.न.पा. यांची मंजुरी प्राप्त आहे व परवाने प्रपत्र/करारनामे जोडलेले आहेत परंतु तत्कालीन तत्कालीन मा. उपायुक्त/मा. अति उपनिगम आयुक्त, म.न. पा. यांची स्वाक्षरी नाही. 2. ज्या प्रकरणांमध्ये परिवर्तन प्रस्तावास मान्यता प्राप्त आहे. परंतु त्यामध्ये परवाने प्रपत्र/करारनामे जोडलेले नाहीत.) म.न.पा.तील बाजार विभाग, मा. उपायुक्त (॥) म.न.पा. यांचे कार्यकक्षेत येत असल्यामुळे अशी प्रकरणे कालांतराने नियमीत करून घेता येईल. आणि पुढे अशा प्रकरणात परिवर्तन करीत असतांना अडचण निर्माण होणार नाही. त्याच प्रमाणे बाजार विभागातील गहाळ असलेल्या धारीकांबाबतची प्रकरणे नियमीत करावयाचे झाल्यास, त्याकरीता मा. स्थायी समिती, म.न.पा. यांच्याकडे असा सविस्तर प्रस्ताव सादर करून ठराव मंजुर करून घ्यावा लागेल. आणि भविष्यात झोन निहाय परिवर्तनाचे प्रस्ताव सादर करीत असतांना अशी अट उदभवनार नाही. आणि भविष्यात अशी प्रकरणे विभागाकडे प्रलंबीत देखील राहणार नाहीत.

प्रस्तुत प्रकरणातील यापुर्वीचा परिवर्तन प्रस्ताव मान्य केल्यानंतर त्यामध्ये एकतर परवाने प्रपत्र/करारनामे परिवर्तन धारकांसोबत करून घेतलेलेच नाहीत किंवा परवाने प्रपत्र/करारनामे संबंधीत नस्त्यांमध्ये जोडुन आहेत. परंतु त्यावर तत्कालीन मा. उपायुक्त/मा. अति उपनिगम आयुक्त, म.न.पा. यांच्या स्वाक्षरी प्राप्त करून घेतलेल्याच नव्हत्या. अशा बाजार विभागातील झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत एकुण 815 तसेच गहाळ धारीका एकुण 533 अशी एकुण 1348 प्रकरणे सध्यास्थितीत जे व्यवसायीक वर्षानुवर्षा पासुन सदरहु दुकान/जागा/ओटा चा वापर करीत आहेत, अशा व्यवसायीकांना म.न.पा. ठराव क्र. 157 दि. 30/08/1994 ची पुर्ण कार्यवाही करून, नियमितीकरण करण्याकरीता निर्णय घ्यावे लागतील म्हणुन नविन परवाना प्रपत्र व करारनामा करून घेवुन प्रकरण नियमितीकरण करणे बाबतचा तसेच गहाळ धारीका नव्याने तयार करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अपर आयुक्त (2) यांनी या प्रस्तावित ठरावाची संपूर्ण विस्तृत चौकशी करावी व 15 दिवसाचे आत वास्तविक व वस्तुनिष्ठ अहवाल आपल्या मतासह स्थायी समितीकडे सादर करावा यासह ठराव कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली

त्या अनुषंगाने स्थायी समिती समोर उचित निर्णयास्तव चौकशी अहवाल (परिशिष्ट 'अ') सोबत जोडला असुन चौकशी अहवालातील शिफारस मध्ये अटी व शर्ती प्रमाणे मान्य करण्यास हरकत नाही असे स्पष्ट केले आहे करीता विभागाने दिलेला प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

## – परिशिष्ट 'अ' –

## चौकशी अहवाल

बाजार विभागातर्फे स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेल्या विषयावर स्थायी समितीने ठराव क्र. 361 दि. 21/12/2015 अनुसार बाजार विभागाचा प्रस्ताव परत करून या प्रकरणात अतिरिक्त आयुक्त (II) म.न.पा. यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त ठराव मा. आयुक्त, म.न.पा. तर्फे दि. 15/01/2016 ला कार्यान्वीत केल्यानुसार खालील प्रमाणे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने व कार्यालयाने दिलेल्या माहिती नुसार अहवाल सादर करण्यात येत आहे.

बाजार विभागातर्फे झोन क्र. 2, 4, 6, 7, 8, 9 आणि 10 या भागामध्ये दुकाने/ओटे/जागांवर एकुण 2400 दुकाने, 612 ओटे आणि 1419 खुल्या जागा असे एकुण 4431 ठिकाणांवर व्यवसाय करण्यात येत आहे.

विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार व नस्तीचे पान क्र. 15 प्रमाणे या संपुर्ण 4431 युनिटपैकी काही त्रुटी असलेल्या 1348 प्रकरणांबाबतची वस्तुस्थिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात येत आहे.

| अ. क्र. | झोनचे नांव व क्र. | ज्या नंस्तीमध्ये परवाना परिवर्तन/करारनामा जोडलेला आहे. परंतु बाजार निरिक्षक/ बाजार अधिक्षक आणि अति. उप. नि. आयुक्त/उपायुक्त /सचिव यांची स्वाक्षरी नाही. | परवाना प्रपत्र जोडलेले नाही. | इस्टेट ऑफीसरची सही | प्रपत्र कोरे आहे | नस्ती गहाळ | एकुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | धरमपेठ झोन क्र. 2 | 45 | 104 | 02 | 00 | 21 | **172** | |
| 2 | धंतोली झोन क्र. 4 | 18 | 28 | 00 | 01 | 163 | **210** | |
| 3 | गांधीबाग झोन क्र. 6 | 70 | 154 | 00 | 00 | 122 | **346** | |
| 4 | सतरंजीपुरा झोन क्र. 7 | 21 | 00 | 00 | 00 | 05 | **26** | |
| 5 | लकडगंज झोन क्र. 8 | 77 | 165 | 00 | 00 | 19 | **261** | |
| 6 | आसिनगर झोन क्र. 9 | 59 | 49 | 00 | 00 | 00 | **108** | |
| 7 | मंगळवारी झोन क्र. 10 | 00 | 22 | 00 | 00 | 203 | **225** | |
| **एकुण** | | **290** | **522** | **02** | **01** | **533** | **1348** | |

उपरोक्त स्थिती लक्षात घेता,

1) 290 अशी प्रकरणे आहेत, ज्यामध्ये संबंधीत नस्तीमध्ये करारनाम्यावर उपायुक्त किंवा बाजार अधिक्षक यांची स्वाक्षरी नाही.

2) 522 प्रकरणात नस्तीमध्ये परवाना प्रपत्र जोडलेले नाही.

3) 2 नस्त्यांमध्ये त्यावेळी बाजार विभाग हा स्थावर विभागाचे अधिन असल्यामुळे तत्कालीन स्थावर अधिकारी यांची करारनाम्यावर/परवाना प्रपत्रावर स्वाक्षरी नाही.

4) 1 नस्ती ज्यामध्ये प्रपत्र कोरे असुन, हे प्रकरण धंतोली झोन क्र. 4 अंतर्गत येत असलेल्या एका दुकानाचे आहे. (मेडीकल चौक पच्छीम दुकान क्र. 19)

5) 533 नस्त्या कार्यालयात शोध घेतल्यानंतरही मिळालेल्या नाहीत.

गहाळ असलेल्या 533 नस्त्या सन 2000 च्या अगोदरच्या कार्यकाळातील असुन, त्याबाबत खालील प्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | झोनचे नांव व क्र. | म.न.पा. मार्केटचे नांव | नस्ती केव्हा तयार करण्यात आली. | गहाळ असलेल्या नस्त्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | धरमपेठ झोन क्र. 2 | गोकुलपेठ मार्केट | 1970 | 21 | |
| 2 | धंतोली झोन क्र. 4 | महात्मा फुले सब्जी बाजार | 1970 | 14 | |
| | | महात्मा फुले भवन | 1970 | 79 | |
| | | भापकर पार्क सुभाष रोड | | 02 | |
| | | नेताजी मार्केट, सिताबर्डी | 1954 | 14 | |
| | | यशवंत स्टेडीयम | 1968 | 10 | |
| | | सुपर मार्केट, सिताबर्डी | 1975 | 44 | |
| 3 | गांधीबाग झोन क्र. 6 | चिटणीस पार्क स्टेडीयम | 1961 | 4 | |
| | | बुधवार बाजार ब्लॉक 'अ','ब' व 'क' | | 18 | |
| | | 1) महाल बुधवारा गच्चीपागा खोली<br>2) बुधवार बाजार टिन शेड ओटा<br>3) खुल्या ओट्या खालील खोल्या | .......... | 31 | |
| | | महाल टांगा स्टॅन्ड मिनी शॉप | .......... | 6 | |
| | | बाबुलाल टक्कामोरे मार्केट पहिला माळा/तळ माळा | 1980 | 6 | |
| | | भालदार पुरा मटन शॉप | .......... | 4 | |
| | | राजविलास बुधवारा कॉम्प्लेक्स | 2000 | 5 | |
| | | बकरामंडी मोमीनपुरा | 1993 | 16 | |
| | | मोमीनपुरा मज्जीद समोरील कॉम्प्लेक्स तळमजला | 1992 | 02 | |
| | | मोमीनपुरा हैदरी रोड कॉम्प्लेक्स | 1992 | 01 | |
| | | संत्रा मार्केट जुनी केला लाईन पान मार्केट टेम्परारी जागा | .......... | 29 | |
| 4 | सतरंजीपुरा झोन क्र. 7 | मस्कासाथ कॉम्प्लेक्स | 2000 | 03 | |
| | | इतवारा दही बाजार | 1960 | 01 | |
| | | इतवारा कडबी बाजार | .......... | 01 | |
| 5 | लकडगंज झोन क्र. 8 | इतवारा टेम्परारी जागा | .......... | 02 | सतरंजीपुरा झोन अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| | | कडबी बाजार धान्य शॉप | .......... | 01 | |
| | | इतवारा मेन रोड | .......... | 01 | |
| | | इतवारा भाजी मंडी | .......... | 04 | |
| | | इतवारा कांजी हॉऊस | .......... | 02 | |
| | | इतवारा जुना मोटर स्टॅन्ड टेम्प. जागा | .......... | 03 | |
| | | लकडगंज रेल्वे सायडींग | .......... | 02 | |
| | | कडबी तणस पडाव | .......... | 04 | |
| 6 | आसिनगर झोन क्र. 9 | ............... | .......... | ........... | |
| 7 | मंगळवारी झोन क्र. 10 | मंगळवारी कॉम्प्लेक्स | 1996 | 12 | |
| | | मंगळवारी कॉम्प्लेक्स जे. बी. विंग, सदर, नागपूर | 1996 | 22 | |
| | | मंगळवारी कॉम्प्लेक्स धनराज बजाज विंग | 1996 | 02 | |
| | | गड्डी गोदाम | 1950 | 56 | |
| | | सदर लिंक रोड | 1983 | 55 | |
| | | मंगळवारी झोन कार्यालयास लागुन असलेली दुकाने | .......... | 02 | |
| | | सदर डिस्पेंसरी पुर्व व उत्तर भाग | 1985 | 12 | |
| | | रेल्वे स्टेशन उड्डाण पुला खालील दुकाने | 2005 | 42 | |
| | | **एकुण** | | **533** | |

गहाळ झालेल्या नस्त्या यासर्व वर्ष 2000 पुर्वी निर्माण झालेल्या मार्केटच्या असुन, नियमाप्रमाणे या काहातील कार्यरत असलेले बाजार निरिक्षक व तत्कालीन बाजार अधिक्षक, यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याअगोदर त्यांचे स्पष्टीकरण मागविणे अपेक्षीत आहे.

बाजार विभागाच्या माहिती प्रमाणे सन जुलै 2000 मध्ये खालील बाजार अधिक्षक व बाजार निरिक्षक कार्यरत असल्याचे निदर्शनास येते.

1) बाजार अधिक्षक :— उपरोक्त कालावधीमध्ये संपुर्णवेळ बाजार अधिक्षक, बाजार विभागात कार्यरत नसल्याचे निदर्शनास येते.

2) सहा. बाजार अधिक्षक :— श्री. एस. एन. देशमुख, (सेवानिवृत्त)

3) बाजार निरिक्षक :— (1) श्री. एस. डी. रोटके, (सहा. अधिक्षक, नेहरूनगर झोन क्र. 5 येथे कार्यरत आहेत.) (2) श्री. यु. आर. मोटघरे, (एल.बी.टी. विभागात कार्यरत) (3) श्री. एस. डी. शास्त्री (सेवानिवृत्त) (4) श्रीमती एस. कर्णासे (सेवानिवृत्त) (5) श्री. एस. एम. वंजारी ( कार्यरत) (6) श्री. जी. जी. राऊत (7) श्री. एस. आर. तुमाने (सेवानिवृत्त)

श्री.एस.डी.रोटके, श्री.यु.आर.मोटघरे, श्री.एस.एम.वंजारी व श्री. जी. जी. राऊत हे कार्यरत असून त्यांचे स्पष्टीकरण बाजार अधिक्षक यांचे मार्फत बोलविण्यात यावे. तसेच इतर सर्व बाजार अधिक्षक व बाजार निरिक्षक हे मागील पांच वर्षापेक्षा जास्त काळापुर्वीच सेवानिवृत्त झालेले असल्याने त्यांचेवर विभागीय चौकशी प्रस्तावित करता येत नाही.

या सर्व 533 प्रकरणाबद्दल आजच्या तारखेस सुध्दा न चुकता संबंधीत दुकाने/ओटे/जागा धारकांपासुन परवाना शुल्क/वापरशुल्क घेण्यात येत आहे. म्हणुन सध्यातरी या गहाळ नस्त्या म.न.पा. जवळ नसल्या तरी **महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले दिसत नाही**.

करीता असे नमुद करावेसे वाटते कि, ज्या एकुण 1348 नस्तयांमध्ये त्रुट्या आहेत त्या सर्व त्रुट्यांची पुर्तता खालील प्रमाणे करता येईल.

1) ज्या 290 नस्त्यांमध्ये तत्कालीन उपायुक्तांची स्वाक्षरी नाही. या सर्वच नस्त्यांना स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर सध्याचे उपायुक्तांची स्वाक्षरी घेवुन नस्त्या नियमित करता येईल.

2) तसेच ज्या प्रकरणांमध्ये उपायुक्त यांची स्वाक्षरी नाही, परवाना प्रपत्र जोडलेले नाही किंवा प्रपत्र कोरे आहे अश्या एकुण (522+2+1) 525 नस्तयांमध्ये परवाना प्रपत्रांवर सध्याचे उपायुक्त यांची स्वाक्षरी घेवुन नविन नस्तीत हे परवाना प्रपत्र जोडण्यात येईल.

3) तसेच 533 गहाळ नस्त्यांचे झोन निहाय एक महिन्याचे आत सध्याच्या उपायुक्तांची स्वाक्षरी घेवुन नविन नस्त्या तयार करता येईल.

यासर्व 533 प्रकरणात संबंधीत कब्जाधारक/परवानाधारक यांचे कडून त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचा आधार घेवून तसेच कब्जाधारक/परवानाधारक यांचे शेजारील आजू–बाजूचे किंवा मागे–पुढे असलेल्या दुकानदारांचे स्टेंटमेंट (बयान) च्या आधारावर नस्ती तयार करण्यात यावी, तसेच कब्जाधारक हा म.न.पा.चा मुळ परवानाधारक आहे किंवा मुळ परवानाधारकासोबत करारनामा करुन सध्या दुकान चालवित आहे हे निश्चित करुन त्या गाळ्यावर स्थायी समितीच्या विविध ठरावानुसार भाडे आकारण्यात यावे.

करीता उपरोक्त स्थिती लक्षात घेता, बाजार विभागाने दि. 21.12.2015 ला मा.आयुक्त यांचे मार्फत पाठवलेल्या प्रस्तावात ज्या प्रशासकीय त्रुट्या दूर करण्यास व त्याला स्थायी समितीच्या नजरेस आणून मान्यतेकरीता पाठविण्यात आलेला विभागाच्या प्रस्तावाला, या अहवालात दिलेल्या अटी/शर्ती प्रमाणे मान्य करण्यास हरकत नसावी.

स्थायी समितीचे यथायोग्य निर्णयास्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 679</u>:— नागपूर महानगरपालिकातर्फे, म.न.पाचे मालमत्तेची देखरेख व सुरक्षेच्यादृष्टिने विविध विभाग व क्षेत्रिय कार्यालयामध्ये दिनांक 21.10.2014 ची निवीदा, स्थायी समिती ठराव क्र. 533, दिनांक 07.02.2015 तसेच कार्यादेश क्र. साप्रवि/02/डब्लु ओ, दिनांक 27.04.2015 अन्वये खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सिकडून दिनांक 01.05.2015 पासुन सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याचा कंत्राट देण्यात आला. निवीदेतील अटी व शर्तीनुसार अट क्र 07'' सुरक्षा गार्डचे वय 18 वर्षापेक्षा कमी आणि 65 वर्षापेक्षा अधिक नसावे, तसेच त्यांची उंची 5'6'', वजन – 60 किलो, छाती – 36' पेक्षा कमी नसावी या वर्णनानूसार डयुटीवर न

आढळल्यास प्रति गार्ड रू. 500 प्रति दिन दंड आकारण्यात येईल '' च्या ऐवजी पसारा ॲक्टप्रमाणे द प्रायवेट सिक्युरिटी एजन्सि ( रेग्युलेशन) ॲक्ट– 2005, द प्रायवेट सिक्युरिटी एजन्सि सेंट्रल मॉडेल रूल 2006 आणि द महाराष्ट्र प्रायवेट सिक्युरिटी एजन्सि (रेग्युलेशन) ॲक्ट– 2007 नुसार नमुद शारीरीक योग्यता ही '' सुरक्षा रक्षकाचे वय 18 वर्षापेक्षा कमी आणि 65 वर्षापेक्षा अधिक नसावे तसेच त्यांची उंची 160 सेमी, छाती – 80 सेमी तसेच त्याचे वजन उंचीनुसार ठरविण्यात येईल. या वर्णनानूसार डयुटीवर न आढळल्यास प्रति गार्ड रू. 500 प्रति दिन दंड आकारण्यात येईल याप्रमाणे '' अट क्र. 07 मध्ये बदल करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 680 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर